**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
जिल्हा परिषद कार्यालयासमोर, नागाळा पार्क, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त व
विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४६८ / कोल्हापूर / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट, जिल्हा परिषद कार्यालयासमोर,
नागाळा पार्क, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर आयुक्त व
विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे, प्रतिनिधी श्री.प्रकाश अष्टेकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे श्री.प्रकाश अष्टेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.६.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१. कोल्हापूर जिल्ह्यातील बँका, पतसंस्था, मॅनेजर/अध्यक्षाने कर्जदारांच्या वसुलीसाठी आपल्याकडे विशेष बाब म्हणून थकबाकीदार यांच्या कर्ज वसुलीसाठी केलेल्या योजनेस मंजुरी मिळण्याबाबत केलेल्या एकूण प्रकरणांची यादी.<br>२. त्यामध्ये आपण ठरविलेल्या व्याज दराबाबत माहिती.<br>३. व्याजदर ज्या निकषावर आधारित दिला त्या निकषाची प्रमाणित छायांकित प्रत.<br>४. व्याजदराबाबत रिझर्व्ह बँकेने निर्गत केलेली परिपत्रकाची प्रमाणित प्रत.<br>५. सहकार आयुक्त व निबंधक सह.संस्था, पुणे याचे दि.१४.१२.२००७ रोजीचे रवि बँक, कोल्हापूर अध्यक्षाना दिलेल्या पत्राप्रमाणे थकबाकी वसुलीबाबत कर्ज घेतलेल्या तारखेपासून थकित प्रकरणावर १६ टक्के सरळ व्याजाने आकारणी करण्याबाबत सहकार आयुक्त यांनी दिलेली मान्यता कोणत्या निकषांनुसार देण्यात आली त्याची प्रमाणित प्रस्तावा वरील आदेशास आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतापत्राची प्रमाणित प्रत.<br>६. मु.क्र.६ मध्ये दिलेली मान्यता व परवानगी ज्या अधिकाऱ्याने दिली त्या अधिकाऱ्याचे नांव, पद व ज्या आदेशाने ते तेथे रुजू झाले त्या आदेशाची साक्षांकित प्रत. | |

## विवेचन

रवी सहकारी बँक, कोल्हापूर या बँकेच्या थकबाकी वसुलीच्या अनुषंगाने सात मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी चुकीची व अपुरी माहिती दिल्याच्या कारणावरुन त्यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त, विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी फेटाळले, म्हणून श्री.देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने आयोजित केलेल्या दि.३०.१२.२००८ रोजीच्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’ला जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे दोघेही स्वत: उपस्थित नव्हते. त्यांनी प्रतिनिधी पाठविले. त्यांनी कोणतीही माहिती सेबत आणलेली नसल्यामुळे श्री.देसाई यांनी आक्षेप घेऊन सुनावणीची विनंती केली. तयानुसार अपील सुनावणीस घेण्यात आले.

सहकार आयुक्तांनी थकित प्रकरणांवरील व्याज आकारण्याबाबत ज्या निकषानुसार मान्यता दिली त्या निकषाची व मान्यतापत्राची प्रत आपल्याला मिळाली नाही, असे श्री.देसाई यांनी ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’तील प्रपत्रात नमूद केले. मान्यतेच्या टिपणीची प्रत आठ दिवसात देण्यात येईल, तसेच निकषाबाबतही पत्रात नमूद करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.एस.टी.तांबे व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.प्रकाश अष्टेकर यांनी प्रपत्रात नमूद केले. त्याप्रमाणे टिपणीची प्रमाणित प्रत श्री.देसाई यांना जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक यांनी पाठविली.

मुद्दा क्र.६ मध्ये दिलेल्या मान्यतेबाबत आपल्याला चुकीची छायांकित प्रत दिली गेली, असे प्रतिपादन श्री.देसाई यांनी केले. मात्र अशा मान्यतेबाबत वेगळा निकष नाही, अवसायकाला सर्व अधिकार असतात असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.प्रकाश अष्टेकर यांनी नमूद केले. इतर सर्व माहिती देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी माहिती देण्यास सक्षम नाहीत, असे श्री.देसाई यांनी ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’तील प्रपत्रात नमूद केले होते. जन माहिती अधिकाऱ्यांच्या सुनावणीतील निवेदनाने त्याला दुजोरा मिळतो. टिपणीची प्रत आठ दिवसात देण्यात येईल व निकषाबाबतही पत्रात नमूद करण्यात येईल, असे प्रतिनिधीने प्रपत्रात नमूद केले होते त्याची पूर्तता झाली नाही व असा वेगळा निकष नसल्याचे जन माहिती अधिकारी नंतर सांगतात, हे आक्षेपार्ह आहे. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कोणतीही पूर्वपरवानगी न घेता गैरहजर राहिले व त्यांनी लेखी

निवेदनही सादर केलेले नाही. माहितीच्या अधिकारातील अर्ज व अपील याबाबत गांभीर्याने दखल घेण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रघुनाथ भाऊ कारंडे
मु.पो.कळंबस्ते, विमल स्टीच्या मागे,
ता.चिपळूण, जि.रत्नागिरी ४१५६०५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, पाटण, ता.पाटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७० / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रघुनाथ भाऊ कारंडे
मु.पो.कळंबस्ते, विमल स्टीच्या मागे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी ४१५६०५

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख, सातारा, जि.सातारा प्रतिनिधी श्री.संभाजी कुंडलिक जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, पाटण, ता.पाटण, जि.सातारा श्री.गोविंद अनंत मुळये

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे खळे, ता.पाटण येथील ग.नं.७११ व ७१३ या गटाच्या मोजणीच्या वेळी सादर केलेले अर्ज व प्रकरणातील सर्व कागदपत्र. जमीन मोजणाऱ्या भूकरमापकाचे नाव, गटबुक नकाशा, फाळणी नकाशा. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रघुनाथ भाऊ कारंडे यांनी जमीन मोजणीच्या संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, पाटण, जि.सातारा यांनी दिली. परंतु कबजेदारांना मोजणीची फेरनोटिस काढून समक्ष मोजणी होण्याच्या मागणीसाठी श्री.कारंडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांच्याकडे अपील केले. ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये येत नसून प्रशासकीय मार्गाने स्वतंत्र अर्ज करुन दाद मागण्याची आहे, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी यांनी अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.कारंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२३.१०.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व दि.१८.२.२००९ रोजी झालेल्या सुनावणीलाही अपीलकर्ता उपस्थित नव्हते. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांनी दिलेला निर्णय कायम करुन अपील निकाली काढण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२.३.२००९
१३-१४

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अरविंद कृष्ण सिधये
द्वारा-जनरल इलेक्ट्रॉनिक्स, ८, लक्ष्मीनगर, फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७१ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा, प्रतिनिधी श्री.एम.एस.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.एन.एल.कुंभारे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. --- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ८७ नुसार बॉम्बे मुंबई तुकडेजोड व

| | |
|---|---|
| | तुकडेबंदी कायदा १९४७ च्या तरतुदीचे पालन करुन एखाद्या सर्व्हे नंबरचे पोट हिस्से पाडले जातात व त्या पोटहिश्श्याचे ७/१२ पाडले जातात. ह्या तरतुदीचे पालन न करता पोटहिस्से पाडण्याची व त्याचे ७/१२ करण्याची पध्दत व त्या विषयीची कादेविषयक तरतूद यासंबंधीची माहिती. वरील तरतूदींचे पालन न करता पोटहिस्से पाडता येतात का, तरतूद नसेल तर तसा स्पष्ट उल्लेख करुन या पत्राचे उत्तर माहिती म्हणून. |

## विवेचन

जमिनीचे पोटहिस्से पाडण्याबाबतची कायदेविषयक माहिती मागणारा अर्ज अपीलकर्ता श्री.अरविंद कृष्णा सिधये यांनी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे केला. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी तो अर्ज जिल्हाधिकारी, सातारा यांच्याशी संबंधित असल्याचे नमूद करुन त्यांच्याकडे पाठविला. 'मागणी केलेली माहिती उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण, जि.सातारा / तहसीलदार, फलटण यांच्या अधिपत्त्याखालील असल्याने' अर्ज त्यांच्याकडे पाठविल्याचे जिल्हाधिकारी, सातारा यांनी श्री.सिधये यांना कळविले. या पत्राविरुध्द श्री.सिधये यांनी अपिलीय प्राधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अपील केले. या प्रकारे अपील योग्य नसल्याचे व कायद्यातील तरतुदी सर्वांना माहित असणे अभिप्रेत असल्याचे नमूद करुन निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा यानी हे अपील निकाली काढले. दरम्यान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, जि.सातारा यांनी संबंधित कायदे कोणते ते कळविले, मात्र श्री.सिधये यांनी केलेली विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील व्याख्येनुसार 'माहिती' ठरत नाही, तसेच पोटहिश्श्याच्या संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयाने काढलेल्या परिपत्रकाची त्यांची मागणी नसून अशा प्रकारचे परिपत्रक काढलेले नाही, हे त्यांना कळविण्यात आले आहे. तरीही विभागीय आयुक्त कार्यालयाकडूनच माहिती मिळावी असा त्यांचा आग्रह आहे, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी सांगितले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातही श्री.सिधये यांनी तसे नमूद केले.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री.सिधये यांनी पोटहिश्श्याच्या अनुषंगाने कायदेशीर तरतुदींची माहिती मागितली आहे. मात्र या तरतुदी न पाळता पोटहिस्सा पाडण्याच्या पध्दतीचीही माहिती त्यांनी मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये ही विचारणा 'माहिती' ठरत नाही, हे, तसेच कायदेविषयक तरतुदी काय आहेत हे विभागीय आयुक्त कार्यालय पातळीवरच कळविता आले असते. तसे न करता विभागीय आयुक्त कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा चिटणीस यांनी अर्ज जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे व जिल्हाधिकारी, सातारा कार्यालयाने हा अर्ज उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण / तहसीलदार, फलटण यांच्याकडे पाठविला. हा कामाच्या टोलवाटोलवीच्या सरकारी कार्यपध्दतीचा नमुना आहे. अशा प्रकारे अर्ज खालून वर व वरुन खाली पाठविणे योग्य नाही, याची नोंद जन माहिती अधिकारी तथा चिटणीस व चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांना देण्यात येत आहे. त्याबरोबरच विशिष्ट कार्यालयाकडूनच माहिती मिळण्याचा आग्रह धरणे योगय नाही, याची अपीलकर्ते श्री.अरविंद कृष्ण सिधये यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.६.३.२००९**

५८-६०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.किसन नाथा आगवणे
मु.पो.निंभोरे, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत निंभोरे, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७३ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किसन नाथा आगवणे
मु.पो.निंभोरे, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, फलटण, जि.सातारा प्रभारी श्री.विलास पो.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत निंभोरे, ता.फलटण, जि.सातारा विद्यमान सौ.मनिषा उत्तमराव तारळकर
तत्कालीन-श्री.रमेश पांडुरंग ननावरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.५.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>ग्रामपंचायत निंभोरे येथील घर मिळकत नं.१४० ची नोंद ८ ड ला कमी केली. त्याबाबतची माहिती. | |

## विवेचन

ग्रामपंचायत निंभोरे येथील मिळकत क्र.१४० ची नोंद कमी केल्याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.किसन नाथा आगवणे विविध अर्जांद्वारे ग्रामसेवक यांच्याकडे मागत आले आहेत. मिळकत क्र.१३९ मध्ये सौ.लिलावती किसन आगवणे याचे नाव कशाचया आधारे दाखल केले, याबाबतची योग्य ती माहिती मिळाली नाही या कारणावरुन श्री.आगवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२३.१०.२००८ रोजी झालेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. माहिती चुकीची दिली असल्याने सुनावणी घेण्याची अपीलकर्ता यांनी प्रपत्रात नोंदविली.

आपण विहित मुदतीत उत्तर दिले असल्याचे व विवाहाची पत्रिका आणि सौ.लिलावती आगवणे यांनी दि.२०.१२.२००६ रोजी दाखल केलेले प्रतिज्ञापत्र या आधारे त्यांची नावे मिळकतीला लावण्यात आली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.रमेश पांडुरंग निंभोरे व अपिलीय प्राधिकारी श्री.विलास जाधव यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. परंतु प्रतिज्ञापत्र दि.२०.११.२००६ चे आहे व नाव २००१ साली लावले. तसेच नावे लावताना आपल्याला कोणत्याही प्रकारे नोटिस दिलेली नाही. मूळ मालकाच्या संमतीविना नोंद केली आहे, असे

प्रतिपादन अपीलकर्ता श्री.आगवणे यांनी केले. हा विषय आपल्या अधिकारातील नसून प्रचलित नियमानुसार अपीलकर्ता त्याबाबत दाद मागू शकतील, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण, जि.सातारा श्री.विलास जाधव यांनी केले. परंतु त्यांची ही भूमिका मूळ माहितीच्या जतनाच्या दृष्टीने योग्य नाही. प्रचलित नियमावलीचे पालन न करता मूळ माहितीत बदल केला गेला असेल तर त्याबाबतची माहिती मागणे हा नागरिकाचा हक्क आहे. तसेच मूळ माहितीचे / कागदपत्रांचे विकृतीकरण करणे ही माहितीच्या अस्सलपणाच्या विरुध्दची कृती आहे. ती करण्याबद्दल तत्कालीन ग्रामसेवक श्री.गजानन महादेव जाधव यांना शास्ती व अन्य कारवाई का करु नये याबाबतचा खुलासा त्यांनी करणे आवश्यक आहे. तसेच मूळ मालकाला कोणतीही कल्पना न देता कागदोपत्री असलेल्या माहितीत बदल करणे अयोग्य असल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण यांनी अचूक माहितीची खात्री करण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया पार पाडली पाहिजे, याची जाणीव आयोगाने दिली. अशी प्रक्रिया पार पाडून पंधरा दिवसात आपण योग्य माहिती सादर करु, असे निवेदन करुन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण मुदत देण्याची विनंती केली. ती आयोगाने मान्य केली.

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) तत्कालीन ग्रामसेवक श्री.गजानन महादेव जाधव यांनी सन २००६ च्या प्रतिज्ञापत्रानुसार सन २००१ साली बदल केला हे समर्थन आक्षेपार्ह आहे. मूळ माहिती बदलण्याबद्दल शास्ती व अन्य कारवाई का करु नये, याचा खुलासा त्यानी दि.१५.३.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. हा खुलासा प्राप्त करुन घेऊन आयोगाला सादर करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण, जि.सातारा यांची राहील.

(३) मूळ कागदपत्रामधील माहितीत मूळ मालकाचा विचार न घेता केलेल्या बदलाबाबतची चौकशी करुन माहितीच्या अचूकतेबाबतचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण यांनी १५ दिवसात द्यावा व त्याबाबतचा अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २.३.२००९
६-८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नरेंद्र राघवेंद्र सुमंत
१०९७-अ, शनिवार पेठ, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर रचनाकार, शहर विकास विभाग,
नगर परिषद सातारा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७४ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नरेंद्र राघवेंद्र सुमंत
१०९७-अ, शनिवार पेठ, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
सातारा नगरपरिषद, सातारा श्री.सतीश कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर रचनाकार, शहर विकास विभाग,
नगर परिषद सातारा, जि. सातारा श्री.प्रशांत राजे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.अमृत सुमंत यांच्या मंजूर केलेल्या इमारतीचा दक्षिणेकडील व उत्तर बाजूकडील १०९७अ, शनिवार पेठ यातील सोडलेले अंतर, श्री.अमृत सुमंत यांच्या नामंजूर नकाशाला इमारतीची लांबीXरुंदी , इमारतीच्या दक्षिणेकडे व उत्तरेकडे सुमंतच्या हद्दीपर्यंत सोडलेले अंतर, मंजूर /नामंजूर नकाशातील टेरेसची लांबी /रुंदी, प्रत्यक्ष सद्यस्थितीतील टेरेसची लांबीरुंदी, सिटी सर्वे नकाशातील पश्चिम बाजूची लांबी. | |

## विवेचन

श्री.अमृत जी.सुमंत याच्या बांधकामाच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.नरेंद्र राघवेंद्र सुमंत हे विविध अर्जाद्वारे, विविध पातळ्यांवर मागत आले आहेत. त्यातील एका अर्जात सातारा नगरपरिषदेच्या जन माहिती अधिका-यांनी पुरविलेल्या नकाशातील मापे खोटी व चुकीची आहेत व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांनी जन माहिती अधिकारी यांचाच निर्णय योग्य ठरविला म्हणून श्री.नरेंद्र राघवेंद्र सुमंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

नकाशाचा अर्थ आपल्याला लावता येत नाही, असे श्री.नरेंद्र सुमंत यांनी सांगितल्यामुळे नगरपरिषदेच्या अधिका-यांनी त्याबाबतची स्पष्टीकरणात्मक माहिती श्री.सुमंत यांना दिली. मंजूर व नामंजूर नकाशाच्या प्रती त्यांना दिल्या, असे जन माहिती अधिकारी तथा शहर रचनाकार, सातारा

नगरपरिषद श्री.प्रशांत राजे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद श्री.सतीश कुलकर्णी यांनी नमूद केले.

श्री.अमृत जी.सुमंत यांनी मिळालेल्या परवानगीव्यतिरिक्त बेकायदेशीर बांधकाम केले आहे, त्यावर कारवाई करण्याची मागणी आपण वारंवार केली असूनही ती केली जात नाही, असे श्री.नरेंद्र सुमंत यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्राप्रमाणेच अन्य निवेदनांद्वारे व आयोगापुढील सुनावणीत तोंडीही नमूद केले. श्री.अमृत सुमंत यांनी मंजूर आराखड्याप्रमाणे बांधकाम केलेले नाही. नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी घेतलेली मापे चुकीची आहेत, गच्चीची मापे अभिलेखात नाहीत असे कळविले आहे, इत्यादी बाबीही श्री.नरेंद्र सुमंत यांनी वारंवार नोंदविल्या आहेत. सुनावणीत त्यांनी त्याचा पुनरुच्चार केला. सुमंत भाऊबंदांमधील वादातून श्री.नरेंद्र सुमंत याच्या बांधकामाला सहहिस्सेदारांची संमती नसल्याने परवानगी देता येत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी श्री.सतीश कुलकर्णी यांनी सांगितले. नगरपरिषदेच्या अभिलेखातील सर्व माहिती दिलेली आहे, मंजूर आराखड्याप्रमाणे बांधकाम झालेले नसेल तर त्या विषयाच्या नियमावलीनुसार प्रशासकीय प्रक्रियेतून दाद मागितली पाहिजे हे श्री.नरेंद्र सुमंत यांना सातत्याने स्पष्ट करण्यात आले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

सुमंत भाऊबंदांमधील वादाची पार्श्वभूमी असलेला हा विषय आहे. श्री.नरेंद्र सुमंत हा विषय सातत्याने मांडत असून माहितीच्या अधिकाराखाली ३७ व लोकशाही दिनात १६ असे एकूण ५३ अर्ज यासंबंधात त्यांनी केले आहेत, असे निवेदन श्री.सतीश कुलकर्णी व श्री.प्रशांत राजे यांनी संबंधित कागदपत्रांसह निवेदन केले.

बेकायदेशीर बांधकाम संगनमताने करु दिले जाते. त्याविरुध्द नगरपरिषद कारवाई करीत नाही, आपल्या घराच्या सांडपाण्याचा प्रश्न वारंवार मांडूनही सोडविला जात नाही, त्यामुळे विविध मार्गांनी आपण अर्ज करीत आलो आहोत, असे प्रतिपादन श्री.नरेंद्र सुमंत यांनी केले.

श्री.नरेंद्र सुमंत यांनी यापूर्वीही केलेल्या या विषयातील अपिलाबाबत (अपील क्रमांक / १०८/२००६) आयोगाने आदेश दिला आहे. बेकायदेशीर बांधकामाविरुध्दची

तक्रार अथवा सांडपाण्याबाबतची कारवाई हा प्रशासकीय कारवाईचा विषय आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अशा कार्यवाहीच्या मागणीचा समावेश होत नाही, याची जाणीव श्री.नरेंद्र सुमंत यांना पुन्हा एकदा देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.४.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महिमुदशा अब्दुल रहीम काझी
रा.शिरवळ, ता.खंडाळा, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी तथा सरपंच,
शिरवळ ग्रामपंचायत, ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४७७ / सातारा / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.जी.आर.कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी तथा सरपंच,
शिरवळ ग्रामपंचायत, ता.खंडाळा, जि.सातारा श्री.बी.एन.खुंटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.६.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.ताहेर अब्दुलरहिम काझी यांनी दि.१३.१२.२००७ रोजी दिलेल्या अर्जानुसार रजिस्टर खरेदीखताअन्वये ग्रामपंचायत मिळकत नं.९४५ चा नोंदीचा उतारा, दस्ताच्या नोंदीबाबतचे अर्जापासून आजपर्यंतच्या कारवाईतील कागदपत्रे व झालेल्या सर्व ठरावांची नक्कल, मिळकतीवर खरेदीपूर्वी चढविलेल्या बोज्यांची नोंद ज्या कागदपत्राआधारे केली आहे व उतरविली आहे, त्या कागदपत्रांची व कागदपत्रांचे आधारे झालेल्या ठरावाची नक्कल. |

## विवेचन

ग्रामपंचायत मिळकत क्र.९४५ च्या संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी तथा शिरवळ ग्रामपंचायत, ता.खंडाळा, जि.सातारा यांनी दिली नाही म्हणून अपीलकर्ता श्री.महिमूदशा अब्दुलरहीम काझी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा, जि.सातारा यांच्याकडे अपील केले. दि.२५.६.२००८ पर्यंत संबंधित माहिती नि:शुल्क देण्याचे ग्रामविकास अधिकारी श्री.बी.एन.खुंटे यांनी सुनावणीदरम्यान मान्य केले. त्यानुसार माहिती द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला. परंतु त्यानुसार मुद्दा क्र.अ ची माहिती मिळाली, तरी मुद्दा क्र.ब व क वरील कार्यवाही झाली नाही, या कारणावरुन श्री.काझी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २३.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

वस्तुत: श्री.काझी यांची मूळ मागणी ग्रामपंचायत मिळकत क्र.९४५ च्या दस्ताची नोंद करण्याची होती. त्यानुसार नोंद करण्यात आली असल्यामुळे माहिती दिली नाही, मुद्दा क्र.ब व क

मध्ये नमूद केल्याप्रमाणे ठराव झाले नव्हते त्यामुळे त्याच्या प्रती देता आल्या नाहीत, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, शिरवळ ग्रामपंचायत श्री.बी.एन.खुंटे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती खंडाळा श्री.जी.आर.कांबळे यांनी त्याला दुजोरा दिला. मात्र अपीलकर्त्यांचे समाधान न झाल्याचे श्री.काझी यांनी नमूद केले.

श्री.काझी यांच्या मागणीनुसार खरेदीखतानुसार नोंद केली व त्यानतर उतारा दिला, त्याला एक आठवडा उशीर झाला. नोंद होईपर्यंत ठराव झालेला नसल्यामुळे त्याची नक्कल देता आली नाही. तसेच पूर्वी रु.५०,०००/- पर्यंतच्या कर्जाची नोंदी खातेउताऱ्यावर केली जात असे, नंतर सदर नियमात बदल होऊन पत्र असेल तरच बोज्याची नोंद करावी; अशी तरतूद करण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.एन.खुंटे यांनी सांगितले. श्री.खुंटे यांनी मूळ अर्जावर कोणतेही उत्तर दिले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा यांनी दि.२५.६.२००८ पूर्वी माहिती देण्याचा आदेश श्री.खुंटे यांना दि.२.६.२००८ रोजी दिला होता. संबंधित माहिती दिल्याबाबतचा अहवाल सादर करण्याची सूचना ही त्यांनी श्री.खुंटे यांना दिली होती. परंतु असा अहवाल सादर न केल्याबद्दल गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांना दि.१.७.२००८ रोजी पत्र दिले होते व श्री.काझी यांना माहिती देऊन दोन दिवसात अहवाल सादर न केल्यास प्रशासकीय कामकाजात हलगर्जीपणा केल्याबद्दल पुढील याग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला होता. त्यानंतर दि.३.७.२००८ रोजी खरेदी दस्ताप्रमाणे नोंद श्री.खुंटे यांनी केली हा तपशील लक्षात घेता मूळ नोंद करण्यातील हलगर्जीपणाबरोबरच श्री.खुंटे यांनी माहिती देण्याबाबतही कुचराई केलेली आहे. याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल त्वरित सादर करण्याची सूचना आयोगाने त्यांना सुनावणीच्या दिवशी दि.१८.२.२००९ रोजी दिली होती. परंतु अशा प्रकारचा कोणताही अहवाल त्यांनी सादर केला नाही. या सर्व बाबी लक्षात घेता श्री.खुंटे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

(१) अपील मान्य.

(२) माहिती देण्यास ७४ दिवसाचा विलंब केल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री.बी.एन.खुंटे यांना प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे रु.१८५००/- शास्ती करण्यात येत आहे. जन माहिती अधिकाऱ्यांकडून ही शास्ती तीन समान हप्त्यात मार्च २००९ च्या एप्रिल २००९ मध्ये देय होणाऱ्या पगारापासून वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा, ता.खंडाळा, जि. सातारा यांनी करुन, तसेच त्याची नोंद सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घेऊन आयोगाला अहवाल सादर करावा. ही जबाबदारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा यांची राहील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.५.३.२००९**

३७-४०